दिनांक - १२/०३/२०२४

# प्रेस नोट

## दोन करोड पेक्षा जास्त किंमतीचा चरस हा अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या परराज्यातील नागरीकास गुन्हे शाखेकडुन अटक .

| | |
|---|---|
| **कक्ष** | गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-०४, गुअवि; अॅन्टॉपहिल, मुंबई |
| **पोलीस ठाणे, गुरक्र. व कलम** | वि.स्था.गु.र.क्र. २५/२०२४ कलम ८(क), २०(क), अंमली पदार्थ विरोधी कायदा. **(कस्तुरबा मार्ग पो.ठाणे, मुंबई वि.स्था.गु.र.क्र.२०४/२०२४)** |
| **गुन्हा घडला दि., वेळ व ठिकाण** | दि.१२/०३/२०२४ रोजी ०४:३० द सेकंड वाईफ फुड कॉर्नरच्या बाजूला,राजाराम जाधव कंपाउन्ड, कॉर्टर रोड नं. ६,बोरीवली रेल्वे स्टेशन,पूर्व बाजूस,बोरीवली,पूर्व,मुंबई या ठिकाणी |
| **दाखल दिनांक** | दिनांक १२/०३/२०२४ रोजीचे १४:४६ वाजता |
| **अटक आरोपींची संख्या** | ०१ ( पुरुष आरोपी ) |

**थोडक्यात हकिकत**

दिनांक ११/०३/२०२४ रोजी कक्ष- ४ कार्यालयास गुप्त बातमीदाराकडून अशी खबर प्राप्त झाली की, दिनांक १२/०३/२०२४ रोजीचे पहाटे ०४:३० वाजताच्या सुमारास वर नमूद ठिकाणी एक २५ ते २७ वर्षे वयोगटातील इसम चरस हा अंमली पदार्थाची विक्री करण्याकरीता येणार आहे. त्यावरून गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष-४ चे अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करण्यात येवून बोरीवली रेल्वे स्टेशन,पूर्व बाजूस,बोरीवली,पूर्व,मुंबई या ठिकाणी या परिसरात सापळा रचण्यात आला होता. दि. १२/०३/२०२४ रोजी ०४:३० वाजण्याचे सुमारास गुप्त बातमीदाराने दिलेल्या वर्णनाचा एक इसम बोरीवली रेल्वे स्टेशन कडून येणाऱ्या रस्त्याने घटनास्थळी येवून संशयितरित्या उभा असल्याचा व कोणाची तरी वाट पाहत असल्याचे दिसुन आले.त्यावेळी त्याचे पाठीमागे काळया रंगाची सॅक बॅग भरलेल्या स्थितीत होती. त्याच्या हालचाली संशयीत वाटल्याने व प्राप्त खबरीमधील इसम हा तोच असल्याची खात्री झाल्याने नमुद पोलीस पथकाने घेराव घालुन त्यास पळुन जाण्याची संधी न देता झडप टाकुन ताब्यात घेण्यात आले.

त्यानंतर जागीच कायदेशीर बाबींची पुर्तता करून दोन पंचासमक्ष त्याची झडती घेण्यात आली असता त्याचे पाठीमागे असलेल्या सॅक बॅगमध्ये बेडसिटमध्ये गुंडाळलेल्या व त्यावर खाकी रंगाची प्लॅस्टीक टेप गुंडाळलेल्या अशा एकूण १४ वडया मिळून आल्या. त्यामध्ये एकूण ७ किलो ४० ग्रॅम चजनाचा चरस हा अंमली पदार्थ आंतरराष्ट्रीय किंमत अंदाजे किंमत २ करोड,११ लाख रुपये एवढया किंमतीचा चरस हा अंमली पदार्थ मिळून आला सदरचा अंमली पदार्थ हा आरोपीत याने बिहार राज्यामधून आणल्याचे सांगितले आहे. सदरबाबत कस्तुरबा मार्ग पोलिस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हा नोद करून त्यास नमूद गुन्हात अटक करण्यात आलेली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसाळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त(गुन्हे) श्री लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री शशी मिना , मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण), श्री. दत्ता नलावडे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (डी-मध्य), श्री.चेतन काकडे यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक इंद्रजित मोरे, पो.नि. नितीन पाटील, सपोनि बिराजदार, सपोनि मुजावर, कक्ष-३, स.फौ. विशीष्ठ कोकणे, स.फौ. संजय परब, सफौ. उत्तम बोटे, पो.शि.चा.लखन चव्हाण, पो.शि.चा. प्रसाद गरवड यांनी पार पाडलेली आहे.